# अमरावती विभागातील सिंचन अनुशेषांतर्गत प्रकल्पांचे भूसंपादन शिघ्रगतीने पार पाडण्याकरीता सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी संवर्गातील नामिकासूची ( Panel) तयार करणेकरीता जाहिरात.

अमरावती विभागातील सिंचन अनुशेष कार्यक्रमातंर्गत प्रकल्पांचे भूसंपादनाची कामे विहीत मुदतीत शिघ्रगतीने पार पाडण्याकरीता कंत्राटीपध्दतीने सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी संवर्गातील (ग्रेड पे रु ५४०० व निवडसूचीतील रु ६६००) अंतर्गत विभागीयस्तरावर शासन निर्णय क्र.संकीर्ण- २७१५/ प्र.क्र.१००/१३ दि.१७ डिसेंबर,२०१६ अन्वये सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने उपलब्ध करुन घेण्याकरीता नामिकासूची (Panel) तयार करावयाचे आहे. त्यानुसार विभागातील जिल्हयाकरीता आवेदनपत्र मागविण्यात येत आहे.

अमरावती विभागातील अमरावती,अकोला,बुलडाणा,वाशिम व यवतमाळ जिल्हयातील भूसंपादनाची प्रकरणे विहीत मुदतीत निकाली काढण्यास्तव करारनाम्यावर कंत्राटी नियुक्ती करण्याकरीता सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी संवर्गातील उमेदवारांचे आवेदनपत्र मागविण्यात येत आहेत. विभागीयस्तरावर नामिकासूची (Panel) तयार करण्यात येवून संबंधीत जिल्हाधिकारी यांचे मागणीनुसार पात्र कंत्राटी उमेदवारांची नावे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यानुसार संबंधीत जिल्हयाचे जिल्हाधिकारी उमेदवारांस आदेश निर्गमित करतील.

याकरीता खालील अटीवर कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळाचे नामिकासूची तयार करण्यात येणार आहे.

**अटी व शर्ती** :-

१) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/ सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

२) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

३) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायीक कामात गुंतलेली नसावी.

४) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

५) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/ माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

६) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेवून कामाचे मुल्यमापन करतील.

७) **मासिक पारिश्रमिक व भत्ते** :- शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७/१२/२०१६ मध्ये नमुद केल्या प्रमाणे निवृत्तीच्या वेतना ऐवढे मासिक पारिश्रमिक **अधिक** मासिक पारिश्रमिक रकमेच्या २५% मर्यादेपर्यंत निवास व प्रवास भत्ता **अधिक** आवश्यकतेनुसार प्रवास व दैनिक भत्ता देय राहील.

८) **अर्हता व अनुभव** :-

१. विवक्षित कामासाठी लागणाणी विशेष अर्हता अथवा संबंधीत कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव ही पुर्वअट.

२. करार पद्धतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी शारीरीक,मानसिक वा आरोग्यच्या दृष्टीने सक्षम असावा व तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

३. करार पद्धतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीती शिक्षा झालेली नसावी.

९) **बंधपत्र /हमीपत्र** :- नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील. विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबत तसेच करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नसल्याचे बंधपत्र/ हमीपत्र सादर करावे लागेल.

१०) **वयोमर्यादा** :- शासन निर्णय दिनांक १७ डिसेंबर,२०१६ मधील अट लागू राहील.

११) अर्जदाराने अर्जासोबत पदासाठी आवश्यक अर्हतेनुसार पुरावे/ प्रमाणपत्रे जोडावीत.( शासन सेवेतून सेवानिवृत्त झाल्याचा पुरावा, शासकीय सेवेत असतांना भूसंपादनाचे काम केले असल्याचे अनुभवाचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.).

१२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ दि.१९ मार्च २०१४ अन्वये तरतूदीनुसार करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीच्या पारिश्रमिकपोटी व भत्त्यापोटी होणारा खर्च संबंधीत जिल्हाधिकारी यांनी भागवावा.

१३) जाहीरात व अर्जाचा विहीत नमुना खालील जिल्हा निहाय वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

१) अमरावती :www.amravati.nic.in २)अकोला:www.akola.nic.in
३) वाशिम: www.washim.nic.in ४) बुलडाणा :-www.buldana.nic.in
५) यवतमाळ:-www.yavatmal.nic.in
६) विभागीय आयुक्त कार्यालय,अमरावती- amravatidivision.gov.in

विहीत नमुन्यातील अर्ज विभागीय आयुक्त कार्यालय,अमरावती,जुना बायपास रोड,कॅम्प रोड, अमरावती पीन कोड -४४४ ६०२ या पत्यावर दि.२०/०८/२०१८ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावा किंवा स्वहस्ते सादर करावा. या जाहीरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहीत कालावधीत प्राप्त होतील अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील.

१४) उमेदवारांना मुलाखतीसाठी हजर राहण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

१५) पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुलाखतीची वेळ व दिनांक पत्राद्वारे व संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

१६) पदांची संख्या कमी जास्त करणे, मुलाखत रद्द करणे, पुढे ढकलणे, तहकूब करणे हे अधिकार राखून ठेवले आहेत.

१७) कामाची गरज संपल्यानंतर किंवा काम समाधानकारक नसल्यास तात्काळ कंत्राटी पदावरुन कमी करण्यात येईल.

(पीयूष सिंह)
विभागीय आयुक्त,
अमरावती

**अमरावती विभागातील सिंचन अनुशेषांतर्गत प्रकल्पांचे भूसंपादन शिघ्रगतीने पार पाडण्याकरीता सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी संवर्गातील नामिकासूची ( Panel) तयार करणेकरीता आवेदन पत्राचा नमुना**

**प्रति,**
मा.विभागीय आयुक्त,
अमरावती विभाग,अमरावती

**विषय :- कंत्राटी पध्दतीने सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी संवर्गातील नामिकासूची ( Panel) तयार करणेसाठी अर्ज**
**संदर्भ :-** दैनिक वर्तमानपत्र -------------------जाहीरात क्र.------------दि. / /२०१८

महोदय,

मी, निम्न स्वाक्षाकींत आपल्या कार्यालयाकडून कंत्राटी पध्दतीने सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी संवर्गातील नामिकासूची (Panel) तयार करणेबाबत दैनिक -------------- वर्तमान पत्रातील जाहीराती नुसार कंत्राटी पध्दतीने सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी संवर्गातील नामिकासूची करीता माझे वैयक्तीक सेवानिवृत्तीच्या तपशिलासह अर्ज सादर करीत आहे.

१) संपूर्ण नांव (आडनाव प्रथम) :-
२) पत्रव्यवहाराचा स्थायी पत्ता :-

३) जन्मतारीख :-
४) शासकीय सेवेतून सेवानिवृत्तीचा दिनांक :-
५) सेवानिवृत्तीचे वेळी धारण केलेले पद :-
६) महालेखापाल यांचेकडून निश्चित झालेले मुळ निवृत्तीवेतन :-
७) पेन्शन खाते क्रमांक व बॅकेचे नांव :-

८) पी.पी.ओ. क्रमांक :-
१०) भूसंपादन विभागात काम केल्याचा अनुभव :-

उक्त नमुद केलेला तपशिल माझे माहिती प्रमाणे सत्य व अचूक असून ही खात्री करुन आवेदन पत्र सादर करीत आहे. वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास मी नियुक्तीस अपात्र राहील.

दिनांक :-
. ठिकाण :-

स्वाक्षरी :-
अर्जदाराचे नांव :-
भ्रमणध्वनी क्रं. :-